# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
# दापोली-४१५ ७१२ जिल्हा रत्नागिरी

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/ईसीसी/शिक्ष. संचा/८१२/२०१७ दिनांक: १५/०७/२०१७

## ई–निविदा सूचना १

"Establishment of Department of Environment and climate change" Dr. Balasaheb Sawant Konkan Krishi Vidyapeeth, Dapoli यांचेकडून नोंदणीकृत उत्पादक, पुरवठादार किंवा अधिकृत विक्रेत्याकडून खालील कामांसाठी "ड" नमुन्यामध्ये (व्दि–लखोटा पध्दत) कार्यालयीन वेळेमध्ये ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | इसारा बयाणा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | प्रत्येक ई–निविदा संचाची किंमत ना परतावा |
|---|---|---|---|---|
| १) | Supply and installation of ESRI's Arc GIS softwares (3 users) along with University Lab Kit and Accessories, DBSKKV, Dapoli | १०,०००/– | १ महिना | ५००/– (ना परतावा) |

## ई–निविदेचे वेळापत्रक

| अ. क्र. | डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाकडील कार्यवाही | पुरवठादार कार्यवाही | दिनांक व वेळ पासून | दिनांक व वेळ पर्यंत | लखोट्याबाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ई निविदा प्रसिध्दीचा दिनांक | –– | १७.०७.२०१७ वेळ १०.०० | – | –– |
| २ | –– | ई निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | १७.०७.२०१७ वेळ १०.०० | ३१.०७.२०१७ वेळ १७.३० | तांत्रिक व आर्थिक लखोटा |
| ३ | –– | ई–निविदा तपशिल तयार करणेसाठी कालावधी | १७.०७.२०१७ वेळ १०.०० | ३१.०७.२०१७ वेळ १७.३० | वरील प्रमाणे |
| ४ | तांत्रिक लखोटा बंद करणे | –– | ३१.०७.२०१७ वेळ १७.३१ | ०१.०८.२०१७ वेळ १७.४५ | |
| ५ | आर्थिक लखोटा बंद करणे | –– | ३१.०७.२०१७ वेळ १७.३१ | ०१.०८.२०१७ वेळ १७.४५ | वरील प्रमाणे |
| ६ | –– | ई–निविदा ऑनलाईन सादर करणे | ०१.०८.२०१७ वेळ १७.४६ | ०३.०८.२०१७ वेळ २३.०० | वरील प्रमाणे |
| ७ | तांत्रिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | –– | ०४.०८.२०१७ वेळ १०.०० | ०५.०८.२०१७ वेळ १७.४५ | तांत्रिक लखोटा |
| ८ | आर्थिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | –– | ०४.०८.२०१७ वेळ १०.०० | ०५.०८.२०१७ वेळ १७.४५ | आर्थिक लखोटा |

# सर्वसाधारण अटी व शर्ती

१) निविदाकाराने ऑनलाईन कोरी निविदा डाऊनलोड करते वेळी उत्पादक असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र, अधिकृत विक्रेते असले बाबतचे प्रमाणपत्र, GST No. (Certificate Provisional ID), आयकर प्रमाणपत्र, पॅनकार्ड मागील तीन वर्षात केलेल्या शासकीय व निमशासकीय कामांची संबंधीत विभागाने दिलेली यादी तसेच सद्या हाती असलेल्या शासकीय/निमशासकीय कामांची संबंधीत विभागाने दिलेली यादी व अन्य अनुभव असल्यास त्या कामांची यादी तसेच बायोडाटा जोडणे आवश्यक असून तांत्रिक, कुशल, अकुशल कामगार इत्यादी बाबतची सविस्तर माहिती स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.

२) वरील कामाची सविस्तर ई–निविदा सुचना १७.०७.२०१७ पासून विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३) सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या मुख्य संकेतस्थळ **maharashtraetenders.in** किंवा **adf.maharashtra.etenders.in** येथे नोंदणी करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीयेत सहभागी होणाऱ्या पुरवठादारांना ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी रु. ५००/– प्रति निविदा जमा करावे लागतील. सदरहू रक्कम पुरवठादाराने ई–निविदा Decryption/Re-encryption करणेचे कालावधीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

४) निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादरीकरण करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा –

Sify Techonoligies Ltd., Nextender (India) Pvt. Ltd. (020) 25315555 Mobile 9167969601/9167969604 Email:-support.gom@nextenders.com

५) निविदाकाराने कोरी निविदा डाऊनलोड करतेवेळी निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई–निविदा संचाचे किंमत संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने जमा करणे बंधनकारक राहील. **पार्ट १ आणि पार्ट २ साठी निविदाधारकाने एकच ई निविदा सादर करावयाची आहे.** अन्यथा ई–निविदा प्रक्रीयेमधून सदर ठेकेदारास अपात्र ठरविण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

६) इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

७) पुरवठाधारकाने निविदा भरताना निविदा नमुन्यातच माहिती भरून निविदा भरावी. अपूर्ण निविदा नमुना विचारात घेतला जाणार नाही.

८) बयाणा रक्कम ही धनाकर्षाद्वारे (डी.डी.) स्विकारणेत येणार नाही. बयाणा रक्कम व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पदधतीने भरावयाची आहे.

९) या विद्यापीठात काम स्विकारताना इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम भरणा करणेसाठी कोणत्याही प्रकारची सूट मिळणार नाही.

१०) अधिक माहितीसाठी Director of Instruction, DBSKKV, Dapoli यांचेबरोबर कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल. ०२३५८–२८४३०८

११) ज्या कंत्राटदाराची निविदा स्विकारण्यात येईल, त्या कंत्राटदारास रू १००/– मात्रचे कोर्ट फी स्टॅम्पवर या कार्यालयाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये करारनामा करून द्यावा लागेल.

१२) कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे. सदर प्रकरणी मा.कुलगुरु महोदयाचा निर्णय अंतिम असेल व तो उभयतांवर बंधनकारक राहील.

१३) पुरवठा धारकाने निविदेमध्ये सर्व दर समाविष्ट करून तसेच दापोली येथे पोहोच यासह सर्व खर्च सामविष्ट करुन निविदा भरावी.

१४) यशस्वी पुरवठा धारकाची निविदा मंजुर झाल्यानंतर त्याच्या देय बिलाच्या रकमेतून ४ टक्के अनामत रक्कम कापली जाईल. सदरहू रक्कम पुरवठादाराने सादर केलेल्या दराच्या एकूण रकमेच्या ४ टक्के इतकी असलेली तसेच त्यांनी निविदेसोबत सादर केलेल्या इसारा (बयाणा रक्कम) रक्कमेचे रूपांतर हे एकूण सुरक्षा अनामत रकमेमध्ये करणेत येईल अशी एकूण ५ टक्के अनामत रक्कम यशस्वी पुरवठादाराकडून घेण्यात येईल.

१५) दिलेल्या मालाचा पुरवठा हा आदेश दिल्यापासून एक महिना कालावधीत करणे बंधनकारक आहे.

१६) कापलेली अनामत रक्कम १ वर्षानंतर कृषि विद्यापीठातून दिली जाईल व त्यावर व्याज दिले जाणार नाही.

१७) पुरवठादाराने पुरवठा केलेल्या ESRI's Arc GIS softwares (3 users) along with University Lab Kit and Accessories दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे करणे बंधनकारक आहे तसे न झाल्याचे दिसून आल्यास त्याबाबत योग्य ती दंडात्मक कार्यवाही करणेत येईल व त्याची वसुली ठेकेदाराच्या देयकातून वजा करणेत येईल याची कृपया नोंद घ्यावी. **(Appendix -II).**

१८) शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेले सर्व प्रकारने कर पुरवठादारावर बंधनकारक राहतील याची नोंद घ्यावी.

**Sd/-**
**Director of Instruction**
**DBSKKV, Dapoli**

**प्रत विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहितीसाठी सविनय सादर**

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर

२. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, सर्व्हे नं. १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

२/– यांना कळविण्यात येते की, प्रस्तावित निविदा उघडण्याच्या तारखेला कृपया आपला प्रतिनिधी पाठवावे हि विनंती.

३. शिक्षण संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

४. संशोधन संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

५. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

६. नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

७. सुरक्षा अधिकारी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली जिल्हा रत्नागिरी यांना माहितीसाठी

८. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

९. नोटीस बोर्ड डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.